I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 122-126
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# वसाहत काळातील महिलांच्या स्थितीचे आकलण

**दिपाली एच. पंधरे[१] व नथ्थु एस. गिरडे[२]**
[१]इतिहास विभाग, नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली
[२]इतिहास विभाग प्रमुख, आर्ट्स अँन्ड वाणिज्य महाविद्यालय, भिसी, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली
*Corresponding Author :-

| Communicated : 16.01.2023 | Revision : 23.02.2023<br>Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

इ.स. १९ व्या शतकामध्ये भारतावर प्रामुख्याने ब्रिटिशांचे राज्य होते. मुघलांचे राज्य गेल्यानंतर भारतावर इंग्रजांचे साम्राज्य सुरू झाले. 'व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले' या उक्तिप्रमाणे ब्रिटिशांनी भारतावर जवळपास २०० वर्षे राज्य केले. याच वेळी व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, लोकशाही, उदारमतवाद इत्यादी युरोपला हलवून सोडणाऱ्या नवविचारांचे प्रवाह इंग्रजी भाषेच्या मदतीने आपल्याकडे वाहू लागले. मुघलकाळात तसेच ब्रिटिशकाळात भारतीय स्त्रियांची स्थिती व स्थान हे दुय्यम दर्जाचे होते. या काळात प्रामुख्याने बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाहास विरोध, हुंडापध्दती या अनिष्ट प्रथा रूढ होत्या. स्त्रियांना समाजात मानाचे स्थान नव्हते. देशाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास ब्रिटिश सत्तेच्या हातात होता. स्त्री आत्मनिर्भर नसल्यामुळे व पुरूषप्रधान संस्कृतिमुळे तिला स्वत:ची निर्णय घेण्याची मुभा देण्यात आलेली नव्हती. पुरूषांच्या अटींच्या अधीन राहूनच आचरण ठेवावे लागत होते. समाजात फक्त 'चूल आणि मूल' एवढेच कार्य मर्यादित होते.

भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अनेक स्वातंत्र्य विरांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.या पुरुषांच्या संसाराला सावरण्याचे कार्य स्त्रियांनी केलेत. १९९७ ते १९९८ हे भारताच्या स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाचे वर्ष होते. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली पन्नास वर्षे स्वातंत्र्य लढयात व स्त्री सुधारणेत असलेल्या महिलांच्या कामगिरीकडे सतत दुर्लक्ष झालेले आहे. म्हणूनच थोर पुरुषांप्रमाणे समाजातील सर्व थरांतील महिलांनी स्त्री सुधारणेत केलेल्या कामगिरीचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला आहे.

भारतीय महिलांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देवून त्यांना मुलभूत हक्क प्राप्त करून देणे, महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिक्षणाचे अधिकार मिळवून देणे, महिलांचा आर्थिक तसेच सामाजिक कार्यात सहभाग वाढविणे, महिलांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविणे यासाठी वसाहतकाळात सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, सरोजिनी नायडू, पंडिता रमाबाई सरस्वती इत्यादी स्त्री समाज सुधारकांनी पुढाकार घेऊन मोलाचे प्रयत्न केलेत.

**मुख्यशब्द** : वसाहतकाळ; भारतीय महिलांची आर्थिक स्थिती; सामाजिक स्थिती; शैक्षणिक स्थिती; स्त्री समाजसुधारक

## प्रस्तावना :

१९ व्या शतकामध्ये भारतात प्रामुख्याने वसाहतवादाचे प्रभुत्व होते. वसाहतवादामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, बुद्विवाद, लोकशाही, उदारमतवाद इत्यादी नवविचारांचे प्रवाह इंग्रजी भाषेच्या मदतीने भारतीय समाजामध्ये रूजू लागले. समाजाकडे तसेच व्यक्तीकडे पाहण्याची एक नवीन प्रकारची दृष्टी यामधून प्राप्त झाली. काळानुरुप चालत असलेल्या रुढी, परंपरा, धर्म, चालीरीती इत्यादी च्या नावाखाली होत असलेल्या अन्यायाविरुद्व मने अस्वस्थ होऊ लागली. माणुसकीला काळिमा फासनाऱ्या ज्या गोष्टी धर्मरूढीच्या नावाखाली आपल्याकडे चालतात त्या बंद होऊन समाजात नवचैतन्य आल्याखेरीज तरणोपाय नाही असा ठाम निश्चय त्यांनी केला. त्यामुळे अत्यंत दयनीय व शोचनीय स्थितीत पडलेल्या स्त्रीला आपल्या उद्वारासाठी नवीन युगात एक आशेचा किरण सापडला. सण १८५८ मध्ये राणी व्हिक्टोरियाच्या जाहीरनाम्यानंतर ब्रिटिश संसदेने भारतासाठी कायदेपद्वतीत सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू केली. यात विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, उत्तराधिकार, दत्तक इत्यादीचा समावेश करण्यात आला. त्याच वेळी सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, सरोजिनी नायडू , पंडिता रमाबाई सरस्वती, आनंदीबाई जोशी, कमलादेवी चटोपाध्याय, रामेश्वरी नेहरू, काशीबाई कानिटकर, ताराबाई शिंदे, अहिल्याबाई होळकर इत्यादी स्त्री समाजसुधारकांनी स्त्रियांच्या पारंपारिक स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी व्यापक अशी सुधारणा मोहीम सुरू केली.

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 122-126
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

**भारतीय महिलांची पार्श्वभूमी:**

इतिहासाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते कि, अगदी ऋग्वेद काळापासून तर वसाहत काळापर्यंत समाजातील रूढी परंपरांनी स्त्रियांना अपार दु:ख दिल्याचे दिसून येते. ऋग्वेद काळातसूद्‌धा मनुची मुलगी इला हिने वडीलांच्या संपत्तीत वाटा मिळाला नाही म्हणून स्वत: घराबाहेर पडून लग्न केले होते आणि स्वतंत्रपणे संसार सुरू केला. स्त्रियांना मिळत असलेल्या दुय्यम स्थानाबद्दल त्याही काळात स्त्रियांनी बंडखोरी केली होती. मात्र असे असले तरी काही मोजक्याच कर्तृत्ववान स्त्रियांचे उल्लेख आढळतात. यामध्ये सैनिकी शिक्षण घेऊन पराक्रम गाजविणाऱ्या स्त्रिया आणि राजकारणाचे धडे घेऊन राज्यकारभार चालविणाऱ्या स्त्रियांचा समावेश होता. परंतु या सर्व स्त्रिया उच्च वर्णीय आणि श्रीमंत कुटुंबातील होत्या. सामान्य आणि तळागळातील स्त्रियांच्या बाबतीत मात्र अंधारयुग होते. विवाह या एकाच घटकाभोवती त्यांचे जीवन बांधलेले होते. बालविवाह, हुंडाप्रथा, सतीप्रथा अशा विविध दुष्ट पद्धतीचे बंधनात अडकलेल्या होत्या. स्त्रियांचे मूलभूत हक्क, शिक्षण, धार्मिक कार्य, आर्थिक हक्क आणि जिवणाला समोरे जाण्याचे धैर्य हे सर्व मार्ग कुंठीत झाले होते. स्त्री समाजापुढील काळोखी रात्र ही एकोणिसाव्या शतकापर्यंत कायम होती. विधवा आणि परित्यक्ता स्त्रिच्या पुनर्विवाहाला विरोध, केशवपनाची दुष्टप्रथा यावर स्त्री समाजसुधारकांनी हल्ले चढविले. स्त्रियांचे प्रश्न समाजासमोर मांडण्यात प्रयत्न करण्यात आले.

**स्त्री स्वातंत्र्याची गरज:**

त्या काळामध्ये समाजसुधारकांनी राज्यकर्त्याकडून स्त्रियांचे प्रश्न समाजासमोर मांडले असले तरी त्यांनी केलेले प्रयत्न अतिशय अपुरे होते. स्त्री शिक्षणावर बंधने लादलेली होती. विवाहाची वयोमर्यादा कमी झालेली होती. विवाहासाठी मुलींचा विचार लक्षात न घेता त्यांच्यावर विवाहासाठी बळजबळी होऊ लागली. यातून मुलींच्या वडीलांना अमिष दाखवून केले जाणारे विवाह किंवा स्वत:च्या फायद्यासाठी सौदा करून केले जाणारे विवाह असे प्रकार रूढ झाले. व्यक्ती म्हणून स्त्रियांचे महत्व कमी होऊन तिचे क्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित झाले. तिची बुद्धीमत्ता आणि कर्तृत्व याकडे समाजाचे दुर्लक्ष झाले होते. स्त्रियांवर लादलेल्या सर्व बंधनातून मूक्त करून त्यांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवून देणे व स्त्रियांचा सर्वांगिण विकास साधने हा मुख्य होता.

**स्त्री समाजसुधारक :**

वसाहतीक काळात महिलांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी ज्याप्रमाणे समाजात पुरुष समाजसुधारकांनी योगदान दिलेत त्याचप्रमाणे स्त्री समाजसुधारकांनी सुध्दा अत्यंत महत्वाचे कार्य केले.

**१) सावित्रीबाई फुले :**

- सावित्रीबाई फुले भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका नव्हे तर कवयित्री, समाजसेवीका आणि पहीली विद्याग्रहण करणारी महिलादेखील होती.
- 'भारतीय स्त्रीवादाची जननी' म्हणून सावित्रीबाई फुले यांना संबोधले जाते.
- सावित्रीबाई आणि त्यांचे पती यांनी १८४८ मध्ये पुण्यात भिडेवाड्यत मुलींच्या शाळेची स्थापना केली.
- महिलांच्या हक्काबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली.
- त्यांनी बालविवाहाविरुध्द मोहीम चालविली आणि पुर्नविवाहाचे समर्थन केले. सतीप्रथेला कडाडून विरोध केला. विधवा आणि वंचित मुलांसाठी कार्य केले.
- पुणे येथील शिक्षण कार्य पाहुन १८५२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने फुले पतीपत्नीचा मेजर कन्डी

यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही देऊ केले.

- त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य महिलांना शिक्षित करण्याकरीता आणि त्यांना त्यांचे हक्क मिळवुन देण्याकरीता खर्ची घातले.

**२) रमाबाई रानडे :**

- रमाबाई ह्या महान स्त्री समाजसुधारक होत्या. त्या आपला पुर्ण वेळ आणि शक्ती स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी कशा होतील आणि आपल्या पायावर कशा उभ्या राहतील याचा विचार आणि कृती करण्यात खर्च करीत असत.

- पती न्यायमूर्ती रानडे यांच्या सामाजिक कार्यात सहभागी होण्याकरीता रमाबाईनी स्वत:ला शिक्षण देण्याचा आणि सुशिक्षित होण्याचा विडा उचलला.

- मुंबईला हिंदु स्त्रियांचा सामाजिक आणि वाङमयीन क्लब स्थापन करुन त्या मार्फत सर्वसाधारण स्त्रियांना भाषा, सामान्य ज्ञान, शिंपीकाम आणि गृहउद्योग यात प्राविण्य मिळवण्यासाठी त्यांनी प्रशिक्षण देणारे वर्ग सुरु केले. इंग्रजी भाषेच्या शिक्षणासाठी विशेष वर्ग चालविले.

- स्त्री शिक्षण, स्त्रियांचे कायदेशिर अधिकार, स्त्रियांना समानतेचे अधिकार यासाठी प्रयत्न केले.

- स्त्रियांनी नर्सेसचा व्यवसाय करावा व त्याकरीता समाजाने त्यांना उत्तेजन द्यावे याकरीता फार प्रयत्न केले. या व्यवसायाकडे नोकरी मिळणारा व्यवसाय म्हणून पाहीले जात असे.

- रमाबाईनी मुंबई मध्ये सेवासदन सोसायटीची स्थापना केली. अनेक दुर्भागी स्त्रियांनी या घरांचा म्हणजे सेवासदनचा आश्रय घेतला. सेवासदनला १९१० मध्ये प्रारंभ केला नंतर या सोसायटीचे रुपांतर संस्थेत झाले या संस्थेने अनेक वसतिगृहे, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये, विक्री केंद्रे इत्यादी स्थापन केले.

- हिंदुस्थानात पाश्चिमात्य आणि मिशनरी स्पिरीटने चालविलेल्या ज्या काही संस्था होत्या त्यात रमाबाईनी आणि स्त्रियांनी संचालीत केलेली सेवासदन ही सर्वात यशस्वी संस्था होती.

**३) पंडीता रमाबाई सरस्वती :**

- पंडीता रमाबाई सरस्वती एक प्रतिष्ठीत भारतीय स्त्री समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्त्या आणि एक कवयित्री होत्या.

- १८८१ मध्ये आर्य महिला सभाची स्थापना केली.

- स्त्रियांविरुध्द जुलूम करणाऱ्या प्रत्येक कायद्याविरुध्द संघर्ष केला.

- १८७८ मध्ये कलकत्ता विश्वविद्यालयाने त्यांना संस्कृत विषयाचे ज्ञान आणि कार्य याबद्दल सरस्वती ही सर्वोच्च पदवी दिली.

**४) सरोजिनी नायडू :**

- सरोजिनी नायडू ह्या क्रांतीकारी महिलांपैकी एक आहेत.

- गुलामगिरीत अडकलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरीता त्यांनी प्रचंड संघर्ष केला.

- उत्तम राजकारणी, महान स्वांतत्र्य सेनानी कवयित्री आणि आपल्या काळातील एक महान वक्त्या देखील होत्या.

- त्यांना भारताची कोकीळा असे देखील म्हणत असे.

- इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या पहिल्या प्रेसिडेंट होत्या.

**५) कार्नेलिया सोराबजी :**

- कार्नेलिया सोराबजी या भारतातुन बॅरिस्टर झालेल्या पहिल्या महिला होत्या.

- भारतात त्यांनी सक्तीने पडद्याआड राहण्याचा महिलांना दिलेल्या शिक्षेविरुद्ध आवाज उठविला.
- कार्नेलिया सोराबजी बॅरिस्टर असुनही कोर्टात महिलांची बाजु मांडण्याचा अधिकार नव्हता. तरीही त्यांनी हार मानली नाही.
- १९०४ मध्ये बंगालच्या कोर्ट ऑफ वॉर्डस मध्ये त्यांना महिला सहाय्यक म्हणून नेमण्यात आले.

**६) आंनदीबाई जोशी :**

- आंनदीबाई जोशी या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर होत्या. केवळ २१ वर्षाच्या जीवनयात्रेत त्यांनी भारतीय स्त्रियांसाठी प्रेरणादायी आदर्श उभा केला.
- 'चूल आणि मूल' म्हणजेच आयुष्य असे समजणाऱ्या समाजाला आंनदीबाई जोशी यांनी आदर्श व मानदंड घालून दिला.
- एकीकडे सावित्रीबाई व ज्योतिबा स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करित असतांनाच आंनदी–गोपाळ हे जोडपे आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी झटत होते.
- जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही काम अशक्य नाही, हे या जोडप्याने सिद्ध करुन दाखविले.

**७) मदर टेरेसा :**

- 'जर जीवन दुसऱ्याकरिता जगता आले नाही तर ते जीवन नाही' असे त्यांचे ब्रिदवाक्य आहे.
- आयुष्यभर दुसऱ्यांची सेवा आणि सहाय्य करित त्यांनी स्वत:ला समर्पित केले.
- अंत्यत उदार, दयाळू, सेवाभाव आणि निस्वार्थपणे प्रेम करणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते.
- सामाजिक कार्यात दिलेल्या महत्वपुर्ण योगदानाबद्दल त्यांना भारत सरकारने १९८० ला देशातील सर्वोच्च असा भारतरत्न पुरस्कार देवुन गौरविण्यात आले.
- भारतातच नव्हे, तर जगाच्या पातळीवर सुद्धा मदर टेरेसा यांच्या कार्याची दखल घेवून १९७९ ला नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.

**निष्कर्ष:**

एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रियांची स्थिती दयनिय होती. समाजसुधारकांनी चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांची अवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. तळागळातल्या स्त्रियांना वैयक्तिक व सामाजिक स्थान मिळवून देवून सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. या सर्व समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून १९ व्या शतकाच्या आरंभीला 'गोठ्यातील दावणीला बांधलेले मुके जनावर' अशी अवस्था असलेली स्त्री २० व्या शतकाच्या प्रारंभीस स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभी राहली.

**संदर्भ :**

क्षिरसागर शोभाताई : महाराष्ट्रातील समाजसुधारक, के. सागर रु –२०१२

डॉ. कोलारकर श. गो.: चाकोरीबाहेरच्या धाडसी स्त्रिया, मंगेश रु, नागपुर – २०१०

प्रा. डॉ. गभणे धनंजय : महाराष्ट्रातील समाजसुधारक व थोर भारतीय विचारवंत, पिंपळापुरे रु, नागपूर.

प्रा. नाथे संजय : महाराष्ट्रातील समाजसुधारक. नाथे रु, नागपूर– २०१२

प्रा. डॉ. खोत एस. के.: सलाम स्त्रीशक्ती, अरीहंत रु पुणे – २०१३

अतकरे के. एच. : भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलाश रु औरंगाबाद – २०११

डॉ. पाटील पद्मजा : भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके रु कोल्हापूर– २००७

डॉ. लांजेवार ज्योती : भारतिय समाज आणि स्त्री, सुगावा रु, सदाशिव पेठ, पुणे – २००५

बिडवे सुनिता : सावित्रिबाई फुले विचार व कार्ये, चिन्मय रु, औरंगाबाद– २०१०

साने गिता : भारतीय स्त्री जीवन, मौज रु मुंबई– १९९७

डॉ. पवार वैशाली : महिलांच्या संघर्षाचा आलेख, डायमंड रु पुणे – २०१२

सरदार ग. बा. : महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली रु मुंबई– १९८१

डॉ. देशमुख अलका : विविधांगी आयामातून स्त्री, श्री साईनाथ रु, नागपूर– २०११

घनश्ययम शहा : भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड प्रकाशन पुणे–२००८